जमिनीची प्रतवारी वाचवण्यासाठी ''सामुहिक कृती :

मूळ लेख : Foundation for Ecological Security

अशा प्रत्येक नैसर्गिक वातावरणात जेथे मानवी हस्तक्षेपाचे अतिरेक झाले, तेथे आजिविका व संसाधनांचे संवर्धन यांची उत्तम सांगड घालता येते. सुदृढ निसर्ग व्यवस्था व पर्यावरण साखळी कायम राखण, त्यांच्या पासून मिळणाऱ्या सेवा सुविधांचा शेती व बिगर शेती उपक्रमातून उत्पन्न घेण्यासाठी वापर करणे आणि यातून जंगल संपत्ती सुरक्षित राखणे व गरिबी निर्मूलन करणे शक्यच आहे. राजस्थानमधिल एका आदिवासी खेड्यात लोकांनी एकत्र येऊन केलेल्या सामुहिक वनांचे संरक्षण व संवर्धन व पडित जमिनी उपजाऊ करण्याच्या प्रयत्नांचे यश या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

चित्रावास एक आदिवासी गाव, ज्यामध्ये भिल्ल आदिवासींची दोन कुळे राहतात.हे गाव अरावली पर्वत रांगाच्या दक्षिणेस वसलेले असून, त्यास बिबटयाचे गाव म्हणून सुद्धा ओळखतात. घनदाट व समृद्ध जंगल, विखुरलेली शेती या पद्धतीचा गांवाविषयीचा इतिहास गावकऱ्यांच्या स्मरणात आहे. मात्र बिबटयांचे घर असलेले, विविध प्राणीजात व वनस्पतीनी समृध्द असलेल्या गावाची, वेगवेगळया जैविक व इतर कारणांमुळे विविधता ऱ्हास पावली. जमीनीची धुप, जंगलतोड, कोरडे होत जाणारे प्रवाह व जमीनीची बदललेली उपयोगिता यामुळे समुदायाच्या जीवनाधारावरती खुप विपरीत परिणाम झाला. समुदायाच्या सामाजिक व संस्थात्मक जडणघडणी वर सुद्धा या बदलांचा विपरीत परिणाम झाला. चित्रावास ग्रामपंचायतमध्ये साकरिया, भामराबरा, पिपलसरी आणि कुंडाला इत्यादी चार वस्त्यां आहेत, 217 हेक्टर पेक्षा जास्त वनजमीन तसेच अभयारण्याच्या पायथ्यांशी वसलेलं चित्रावास एफ.ई.एस चा हस्तक्षेप 2001 मध्ये एफ.ई.एस संस्थेने गावांमध्ये काम करण्यास सुरूवात केली. प्रारंभीच्या चर्चेमधून गावामध्ये जंगल बचाव व व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली. जी पुढे वन विभागाशी संलग्नित करून वन विभागाच्या सुक्ष्म आराखडयाप्रमाणे काम करण्यास सुरुवात झाली. परंतु सिमांकीत केलेल्या भागातच वावर व वापर करण्याच्या तत्वा नुसार अनेक अडथळे आले. क्याराका खेत वस्ती (रावच नावाच्या महसुली गावांमधील तांडा) आणि रिचवारा महसुली गाव दोन्ही वस्त्यांनी त्यांच्या अधिकाराकरिता हरकत घेण्यास विरोध करण्यास सुरुवात केली. या वादातूनच उपभोगासाठी संसाधनांचा वापर ही संकल्पना समोर आली. नंतर एफ ई एस टिम व गावांमधील समुदायानी हकदारी यादी तयार करण्यास पुढाकार घेतला.ही हकदारी यादी VFPMC चे सभासदत्व निश्चीत करण्यामध्ये उपयोगी पडली. 325 कुटुंब, 1508 लोकसंख्या मधून 999 हकदार (18 वर्षावरील) गरासीया आणि गामेती वंशाचा सर्व आदिवासींना यामध्ये समाविष्ट करण्यात आले. संयुक्त वन व्यवस्थापनाच्या माध्यमातून, 217 हेक्टर वन जमीनीचे सामुहीक पद्धतीने संरक्षण व व्यवस्थापन करण्याचे सर्वांनी मान्य केले. सहभागितांची अशा पद्धतीची नवीन समजेसह, वेगवेगळया बैठकांचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये पर्यावरणाची साखळी पुर्नजिवीत करणे तसेच वन विभागाने तयार केलेला आराखड्याचे पुर्नलेखन करणे हे



चित्रावास गावातील लोकांची सामुहिक कृती.

ठरले

लोक सहभाग आणि भौतिक हस्तक्षेप

हितसंबंधीच्या मान्यतेप्रमाणे समुदायांनी सामुहिक पद्धतीने संदर्भ असलेली विशिष्ट नियमावली विकसीत केली. कामाची अंमलबजावणी करण्याकरीता वेगवेगळया वस्ती/ तांडयामध्ये विखुरलेल्या अनेक हितसंबंधीची मान्यता/सहभाग घेण्याकरिता समुदायांनी नियमीत बैठका, स्वमुल्यांकन, चर्चा वाटाघाटी ज्यामध्ये पुर्वीच्या व्यक्तीकेंद्रीत पध्दती जसे मते (मते हा गावामधील एक प्रभावी व्यक्ती पर्यवेक्षक म्हणून आहे.) या पद्धतीने लोकांनी कामाची परीणामकारकता वैयक्तीक संसाधनावरील मालकी हक्क आणि सर्वात महत्वाचे पारंपारीक शक्ती केंद्राचे महत्व कमी करणे इत्यादी प्रश्न हाताळले.

वन विभागाकडून आराखडयास मंजुरात मिळाल्यानंतर सर्वप्रथम वनजमीनीचे संरक्षण करण्याकरिता दगडी भिंतीचे पुर्नबांधणीचे काम हाती घेतले सोबतच भिंतीला लागून जेट्रोफाची लागवड केली. जल व मृद संवर्धनाचे विविध उपचार ज्यामध्ये दगडी चेक डॅम, गली प्लग, समपातळी चर, व वनराई बंधारे इत्यादी कामे मूळस्थळी माती व पाणी संवर्धनाच्या दृष्टीकोनातून करण्यात आली. संपुर्ण क्षेत्रफळावर वनस्पतीसदृश कुंपण ज्यामध्ये स्थानिक प्रजाती व गवताचे 50,000 पेक्षा जास्त रोपांची लागवड करण्यात आली.

यासोबतच सामुदायिक जमीनीचा विकास करण्याकरिता महिलांच्या गटाद्वारे विविध जीवनाधारीत उपक्रम सुरू केलेत, ज्यामध्ये शेतीची बांधबंदीस्ती, खासकरून अतीगरीब कुटुंबाकरिता पिण्याचे पाणी व सिंचनाच्या सोयीसुविधा निर्माण करणे, उर्जा संवर्धन, परसबाग व कुरण विकास इत्यादी कामे करण्यात आली. यामुळे फक्त जीवनाधारच निर्माण झाला नाही तर महिलांचे नेतृत्त्व समोर आले तसेच सामुदायिक निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना स्थान प्राप्त झाले.

समस्या

जशी जशी कामांनी गती घेतली, त्याचपद्धतीने अनेक समस्यांनी गावास ग्रासले. सर्वात लक्षकेंद्रीत समस्या म्हणजे वनजमीनीवरील केलेले अतिक्रमण. लाला भाऊजी या गावकऱ्याने शेतीकरीता अंदाजीत 2.3 एकर वनजमीनीवर अतिक्रमण केले. गावकऱ्यांनी त्यास पिक कापणी

पर्यंतचा वेळ दिला की कापणी नंतर तो स्वतः वन कुंपण घालेल. परंतु कापणी नंतर जमीन खाली करण्याऐवजी दुसऱ्या पिकाकरीता जमीन तयार करणे लालानी सुरू केले. व गावाचा आदेश पालन करण्यास मनाई केली. त्या वेळेस व्यापक प्रमाणावर सामुदायिक धरणे, अनेक आम सभांचे आयोजन या विषयावर करण्यात आले. तरीसुध्दा लाला भाऊजींनी या बैठकांना येणे टाळले. लोकांनी लालाच्या घराबाहेर बैठकांचे आयोजन केले. विषय पंचायत मध्ये पोहोचला. शेवटी समुदायाच्या दबावापुढे लालांनी अतिक्रमण मोकळे केले व संपुर्ण प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यास सुरुवात केली.

सुरक्षा यंत्रणा

प्लॉटच्या सुरक्षेकरिता विविध उपाययोजना जसे की पगारी रक्षक, काही वैयक्तीक व्यक्तीं कडे जबाबदारी देणे, वारंवार निरूपयोगी ठरल्यानंतर, समुदायांनी त्यांची स्वतःची लाठी पद्धत अस्तित्वात आणली. सामुदायिक जंगल संरक्षण पद्धती म्हणजे लाठी पद्धत. ज्यामध्ये वेगवेगळया 3 कुटुंबामधील 3 व्यक्ती प्लॉट जंगलाच संरक्षण करतील.

गावाची सामुहिक ताकद वनसंसाधनाचा कारभार उत्तमपणे सांभाळू शकते व बायोमास, पाणी व मृदसंधारण सुधारू शकते हे या यशोगाथेतून स्पष्ट होते.

आपल्यासोबत जे दिवसभर काठी ठेवत. व संध्याकाळी ती काठी पुढील तीन कुटुंबाच्या स्वाधीन करणे ज्यामधून, संरक्षण कर्तव्य सुध्दा हस्तांतरीत व्हायचे. वेगवेगळया वस्ती, तांडयामधून लाठी हस्तांतरीत होत जायची ज्यामधुन एक सामुदायीक पद्धतीचे प्रात्यक्षिक घडत जायचे. एखादं जनावरं प्लॉट मध्ये आढळल्यावर विषय गाव समितीमध्ये जायचा. व नियमानुसार त्यावर दंड आकारला जायचा. दुरच्या गावामधील लोक प्लॉट सुरक्षा मोहीमेमध्ये सहभागी होऊ शकत नव्हते. त्यामुळे त्यांनी उत्पादनाकरीता जास्त किंमत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. चित्रावासनी सुरूवातीला इतर गावांचे प्रतिनिधीचे सदस्यत्व नाकारले आता ते स्विकारतात. आता संपुर्ण गावामधुन वनजमीनीमध्ये संबंध असलेली लोकं लोक संस्था मध्ये प्रतिनिधीत्व करीत आहेत. तसेच व्यवस्थापन समीती मध्ये विविध तांडयामधील सभासद सहभागी झालेत. सहभागी निर्णय प्रक्रिया इत्यादी विकासात्मक प्रक्रियांमुळे लोकसंस्थाचे बळकटीकरणास सुरुवात झाली.

साध्य

अनेक साध्य या कामामुळे प्राप्त झालीत. लोकांची सामुहिक शक्ती प्रगत स्वशासनाच्या माध्यमातून झळाळू लागली.

स्थानिक प्रगत स्वशासन

सामुहीकपणे जंगल, करणं, पाणी संसाधनाचे संवर्धनाद्वारे समुदायास स्थानिक स्वशासन निर्माण करणे शक्य झाले. आणि हे फक्त संवर्धना पुरतंच मर्यादीत नाही तर सामाजिक सांस्कृतिक राजकिय आर्थीक पैलुं बाबत सुध्दा शक्य झाले. अती गरीब कुटुंबावरती भर देऊन, स्थानिक संदर्भ असलेली नियमावली, समुदायांमधील विविध हित संबंधाचे व्यवस्थापन इत्यादी शक्य झाले.

व्हिजिटेटीव्ह सुधारणा

बायोमास मध्ये संख्यात्मक व गुणात्मक सुधारणा पुर्ननिर्मित प्रयत्नांचाच परिणाम आहे. विश्लेषणात्मक माहितीच्या आधारे. असंरक्षित प्लॉट मध्ये बायोमासचे प्रमाण 140.43 टन/ हेक्टरी च्या तुलनेमध्ये संरक्षित प्लॉट मध्ये 301.62 टन/हे. नी सुधारणा झाली. जैवविविधतेच्या बाबतीतील वाढनोंदणी योग्य झाली. पुर्वीच्या 3 वनस्पती, 4 झुडपे, आणि 12 गवताळ प्रजातीच्या तुलनेमध्ये संरक्षित प्लॉट मध्ये 11 वनस्पती, 29 झुडपी व 24 गवताळ प्रजातीची वाढ झाली.

मृद सुधारणा

संरक्षित प्लॉट मधील बायोमास मध्ये झालेल्या वाढीमूळे मातीच्या आरोग्यावर सुद्धा परिणाम झाला. विश्लेषणाद्वारे सेंद्रीय कर्ब, नत्र, उपलब्ध पलाश यामध्ये वाढ झाली. आम्ल विम्ल निर्देशांक, विद्युत वाहकता सोबतच, अनेक पोषक तत्वांनी परीसरांमधील माती समृध्द झाल्याचे निदर्शीत झाले.

जलसंदर्भातील सुधारणा

पाण्याचा भुगर्भातील साठा व माती मध्ये झिरपणे यामुळे स्थानिक, प्रादेशीक जागतीक जल चक्रामध्ये सेंद्रीय तत्वांची महत्वाची भुमिका आहे. सेंद्रीय तत्वांनी युक्त जमीनीमध्ये पाणी झिरपण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले . हे झिरपलेले पाणी पिकांस उपलब्ध झाले किंवा खोल माती मध्ये झिरपले ज्यामधून भुगर्भातील पाणीसाठा वाढीस लागला. भुगर्भातील पाणी पिण्याकरिता व सिंचनाकरिता वापर होत असल्यामुळे, पाण्याचे पुर्नभरण खुप महत्वाचे आहे. जेव्हा जमिनीमधील सेंद्रीय पदार्थ कमी होतात तेव्हा मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. परीणामी पाण्याचे मोठया प्रमाणात भुपृष्ठावरून वहन होते. सोबत मोठया प्रमाणात मातीची धुप होते. चित्रावास मध्ये सेंद्रीय तत्वांमधील वाढी मुळे, बायोमास मुळे, भुगर्भातील जल पुर्नरभरण वाढले. व ओढे, प्रवाह जी पुर्वी वर्षाच्या ठरावीक महीन्यामध्येच वाहायाची ती आता जास्त काळ वाहतात. ज्यामुळे विहीरींची पाण्याची पातळी वाढली. (गावांमधील 50 विहीरीपैकी पुर्वी 40 विहीरी कोरडया असायच्या आता फक्त 10 च विहीरी कोरडया आहेत.)

निष्कर्ष

दक्षिण अरावती पर्वत रांगापासून ते छोटा नागपूर पठार पर्यंत देशामध्ये जास्तीत जास्त भारतीय आदिवासी समुदाय डोंगर उतार व जंगलांनी व्याप्त भुप्रदेशामध्ये वसलेला आहे. उंच डोंगरभागामधील जंगल तोडी मूळे, खालील शेतजमीनीमधील मातीची मोठया प्रमाणात धुप होते. या भागामधील नैसर्गिक संसाधने संवर्धन केंद्रीत झालेल्या कामामूळे, पुर्नस्थापित पर्यावरण साखळी प्रयत्नांची पराकाष्ठा यामुळे स्थानिक लोक संस्था, सामुहिक कृती, मुळे वनजमीनी, सामुहिक जमिनीचे व्यवस्थापन व वापर समुदायाच्या हिताकरिता अधिक बळकट होते. अनंत कालावधी पर्यंतची सुरक्षा, स्थानिक लोकांची वनसंरक्षणा मध्ये सहभाग, संयुक्त वन व्यवस्थापनाच्या पद्धतीमुळे सुनिश्चित होतो. मानवी हस्तक्षेपा मूळे आधुनिक बदल घडून आलेल्या नैसर्गिक वातावरणामध्ये संवर्धन व जिवनाधार याबाबतची सांगड की जी एकमेकास पुरक आहे यास वाव आहे. सुदृढ निसर्ग व्यवस्था व पर्यावरण साखळी कायम राखणे, त्यांच्या पासून मिळणाऱ्या सेवा सुविधांचा शेती व बिगर शेती उपक्रमातून उत्पन्न घेण्यासाठी वापर करणे आणि यातून जंगल संपत्ती सुरक्षित राखणे व गरिबी निर्मूलन करणे शक्य आहे.

मूळ लेख : Foundation for Ecological Security

हा लेख पुर्नप्रकाशित आहे.
मूळ इंग्रजी लेख http //www.sapplpp.org या संकेतस्थळावर पाहण्यास मिळेल

Source : *Collective action to reduce land degradation, LEISA India , Vol.16,No.3 ,September 2014*

मराठी अनुवाद : सुरेश तुले